# भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना अंमलबजावणी सुचना

**प्रस्तावना :**

राज्यामध्ये सन १९९० पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड योजना राबविण्यात आली असून सदर योजनेअंतर्गत अर्थसहाय्य देणे टप्प्या-टप्प्याने बंद केले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत "जॉबकार्ड धारण करणारे अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी आणि अनुसूचित जाती-जमातीचे शेतकरी" फळबाग लागवडीकरीता दोन हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत अनुदानास पात्र आहेत. सबब, राज्यामध्ये ८० टक्के अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी असूनही, जॉबकार्ड नसल्याने ते सदर योजनेचा लाभ मिळण्यास अपात्र ठरत आहेत. तसेच केंद्र शासनाने सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे निश्चित केले आहे. ही योजना शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टिने सहाय्यभूत ठरणार आहे. तसेच योजनेच्या माध्यमातून पिक व पशुधन याबरोबरच फळबागेच्या रुपाने शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे फळबाग लागवडीमुळे नैसर्गिक संसाधनाचे संवर्धन करुन काही प्रमाणात हवामान बदल व ऋतु बदलाची दाहकता व तिव्रता सौम्य करण्यास मदत होणार आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-१९ च्या खरीप हंगामापासून राज्यात राबविण्यात येत आहे.

**(१) योजनेत सहभागी होण्याची कार्यपद्धती :**

१.१ राज्य / जिल्हास्तरावरुन वर्तमानपत्रामध्ये दरवर्षी माहे एप्रिलमध्ये जाहीरात प्रसिद्ध करुन तसेच अन्य माध्यमाद्वारे पुरेशी प्रसिद्धी देऊन इच्छुक शेतकऱ्यांचे अर्ज मागविण्यात येतील.

१.२ इच्छुक शेतकऱ्यांनी जाहिरात दिल्यापासून किमान २१ दिवसात अर्ज सादर करावा.

१.३ योजनेअंतर्गत तालुक्यास दिलेल्या आर्थिक लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास तालुकानिहाय सोडत काढून प्राधान्यक्रम यादी करुन लाभार्थी निवड करण्यात येईल.

१.४ लाभार्थी निवडीसाठी सोडतीचे ठिकाण, दिनांक व वेळ या बाबी तालुका कृषि अधिकारी आणि उपविभागीय कृषि अधिकारी हे संयुक्तपणे निश्चित करतील.

१.५ तालुक्यास नेमून दिलेल्या आर्थिक लक्षांकापेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास त्या तालुक्यासाठी पुन:श्च जाहीरात देवून ८ दिवसात अर्ज मागविले जातील.प्राप्त होणाऱ्या अर्जांमूधन विहीत कार्यपद्धतीनुसार लाभार्थी निवड करण्यात येईल.

१.६ तालुक्यामध्ये दुसऱ्यांदा संधी देऊनही लक्षांकापेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सदर तालुक्याच्या शिल्लक निधीचे फेर वाटप जिल्हयामधील अन्य तालुक्यांना त्यांच्या मागणीच्या प्रमाणात करावे. सदरची कार्यवाही अर्ज सादर करावयाच्या मुदतीनंतर १५ दिवसांत पुर्ण करावी.

१.७ त्याचप्रमाणे जिल्हयाचा निधी शिल्लक राहत असल्यास विभागीय कृषि सहसंचालक यांनी प्रथमत: विभागातील अन्य जिल्हयास त्यांच्या मागणीच्या प्रमाणात शिल्लक निधीचे फेर वाटप करावे.

१.८ फेरवाटपानंतर विभागातील निधी शिल्लक राहत असल्यास त्याचे कृषि आयुक्तालयस्तरावरुन मागणी असलेल्या अन्य विभागातील जिल्हयांना वितरण आयुक्त कृषि यांच्या मान्यतेने संचालक फलोत्पादन करतील.

१.९ निवड झालेल्या लाभार्थ्यांनी २ दिवसात आवश्यक ती कागदपत्रे सादर करावीत.

१.१० कागदपत्रे प्राप्त होताच लाभार्थ्यांना पूर्वसंमती प्रदान करण्यात येईल. तसेच लाभार्थ्यांच्या इच्छेनुसार त्यांना शासकीय अथवा कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिकेतून कलमे / नारळ रोपे उचल करण्याचा परवाना देण्यात येईल.

१.११ लाभार्थ्यांनी पूर्वसंमती मिळाल्याच्या दिनांकापासून ७५ दिवसामध्ये सर्व बाबींसह फळबागेची लागवड करणे आवश्यक राहील.

१.१२ पूर्वसंमती प्राप्त लाभार्थ्यांने ७५ दिवसामध्ये फळबागेची लागवड केली नाही तर त्याची पूर्वसंमती रद्द समजण्यात येईल आणि प्रतिक्षा यादीतील आद्यक्रमानुसार पात्र लाभार्थीची निवड करण्यात येईल.

**(२) क्षेत्र मर्यादा :**

२.१ या योजनेअंतर्गत फळबाग लागवडीकरीता कोकण विभागासाठी किमान ०.१० हेक्टर ते कमाल १०.०० हेक्टर तर उर्वरीत विभागासाठी किमान ०.२० हेक्टर ते कमाल ६.०० हेक्टर क्षेत्र मर्यादा अनुज्ञेय राहील.

२.२ कमाल क्षेत्रमर्यादेत लाभार्थी त्याच्या इच्छेनुसार एकापेक्षा जास्त फळपिके लागवड करु शकेल.

२.३ लाभधारकाचे ७/१२ च्या नोंदीनुसार, लाभार्थी जर संयुक्त खातेदार असेल तर **संयुक्त खात्यावरील त्याच्या नावे असलेल्या क्षेत्राकरीता** लाभ देण्यात यावा.

२.४ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी याजनेमध्ये पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांना या (MREGS) योजनेचा दोन हेक्टर क्षेत्रापर्यंत लाभ घेतल्यानंतर उर्वरीत क्षेत्रासाठी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमूधन लाभ घेता येईल.

२.५ लाभार्थ्याने यापूर्वी राज्य रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड वा **अन्य** योजनेअंतर्गत लाभ घेतला असल्यास सदर लाभ घेतलेले क्षेत्र वगळून उर्वरीत कमाल क्षेत्र मर्यादेपर्यंत लाभार्थी पात्र राहील.

**(३) लाभार्थी पात्रतेचे निकष :**

३.१ या योजनेअंतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांनाच लाभ घेता येईल. संस्थात्मक लाभार्थ्यांना लाभ घेता येणार नाही.

३.२ शेतकऱ्याच्या स्वत:च्या नावे ७/१२ असणे आवश्यक आहे. जर ७/१२ उताऱ्यावर लाभार्थी संयुक्त खातेदार असेल तर सर्व खातेदारांचे फळबाग लागवडीसाठी संमतीपत्र आवश्यक राहील.

३.३ जमिन कुळ कायदयाखाली येत असल्यास ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना राबविण्यासाठी कुळाचे संमतीपत्र आवश्यक राहील.

३.४ सर्व प्रवर्गाअंतर्गत ज्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाची उपजिवीका केवळ शेतीवर अवलंबून आहे त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल व त्यानंतर अन्य शेतकऱ्यांचा विचार करण्यात येईल. (कुटुंबाची व्याख्या-पती,पत्नी व अज्ञान मुले)

३.५ प्राप्त झालेल्या अर्जामधून लाभार्थ्यांची निवड करताना अनुसूचित जाती/ जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक, महिला, दिव्यांग व्यक्ती यांना प्राधान्य देण्यात यावे.

३.६ परंपरागत वन निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम, २००६ नुसार वनपट्टे धारक शेतकरी योजनेत लाभ घेण्यासाठी पात्र राहील.

३.७ **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत लाभ देण्यास पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत**

**अर्थसहाय्य देण्यात येवू नये तथापि, त्यांची दि.६ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ७.३ व ७.४ मध्ये**

**नमूद केल्यानुसार या योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणून निवड करता येईल.**

**(४) समाविष्ट बाबी :**

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये **तक्त्यात दर्शविलेल्या कामांचा** समावेश राहील. त्यापैकी शेतकऱ्याने स्वखर्चाने करावयाची कामे व शासन अनुदानीत कामे पुढीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | कामे | आर्थिक भार |
|---|---|---|
| **अ.** | **शेतकऱ्यांनी स्व-खर्चाने करावयाची कामे** | |
| १ | जमिन तयार करणे. | **१०० टक्के लाभार्थी शेतकरी** |
| २ | माती व शेणखत / **सेंद्रिय खत** मिश्रणाने खड्डे भरणे. | |
| ३ | रासायनिक खत वापरुन खड्डे भरणे. | |
| ४ | आंतर मशागत करणे. | |
| ५ | **काटेरी झाडांचे कुंपण करणे**. (ऐच्छिक) | |
| **ब.** | **शासन अनुदानीत कामे** | |
| १ | खड्डे खोदणे. | १०० टक्के राज्य शासन |
| २ | कलमे लागवड करणे. (नारळाच्या बाबतीत रोपे) | |
| ३ | **पीक** संरक्षण. | |

| | | |
|---|---|---|
| ४ | नांग्या भरणे. | |
| ५ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे. | |

**फळझाड लागवडीसाठी मुदत :**

या योजनेअंतर्गत फळबाग लागवडीचा कालावधी प्रतिवर्षी १ मे ते ३० नोव्हेंबर पर्यंत राहील. योजनेत सहभाग घेण्यासाठी अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

**(५) तांत्रीक व प्रशासकिय मंजूरी :**

५.१ पुर्वसंमती दिल्यानंतर कृषि सहाय्यक यांनी ७ दिवसात अंदाजपत्रक तयार करावे. मंडल कृषि अधिकारी यांनी अंदाजपत्रकाची छाननी करुन 3 दिवसाच्या आत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे शिफारशीसह मंजुरीसाठी पाठवावे.

५.२ एक हेक्टर क्षेत्रापर्यंत फळबाग लागवड अंदाजपत्रकास तालुका कृषि अधिकारी तांत्रीक व प्रशासकीय मान्यता देतील.

५.३ एक हेक्टर क्षेत्रापेक्षा अधिकच्या क्षेत्रावरील फळबाग लागवड अंदाजपत्रकास उपविभागीय कृषि अधिकारी तांत्रीक व प्रशासकिय मान्यता प्रदान करतील.

५.४अंदाजपत्रक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १ आठवडयाच्या आत तांत्रीक व प्रशासकिय मान्यता प्रदान करणे. तालुका कृषि अधिकारी आणि उपविभागीय कृषि अधिकारी यांना बंधनकारक राहील.

५.५ प्रत्येक लाभार्थीच्या जमिनीवरील फळबाग लागवड हा स्वतंत्र प्रकल्प समजण्यात येईल. अशा प्रत्येक प्रकल्पासाठी प्रशासकिय व तांत्रीक मान्यता स्वतंत्रपणे देण्यात यावी.

५.६ लागवडीची अंदाजपत्रके तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच लाभार्थ्याने फळबागेची लागवड करावी.

**(६) अनुदान वितरीत करण्याचे निकष :**

६.१ या योजनेअंतर्गत लाभार्थ्यास एकूण ३ वर्षाच्या कालावधीत ५०:३०:२० प्रमाणे अनुदान देय राहील. उदा. आंबा कलमे १०X१० मीटर अंतरावर लागवड केल्यास खालीलप्रमाणे तीन वर्षात अनुदान देण्यात यावे.

| अ.क्र. | बाब | वर्ष पहिले | वर्ष दुसरे | वर्ष तिसरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | खड्डे खोदणे | ९९४७ | ० | ० | ९९४७ |
| २ | कलमे लागवड करणे | १००६० | ० | ० | १००६० |
| ३ | नांग्या भरणे | ० | २०१२ | ० | २०१२ |
| ४ | ठिबक सिंचनाव्दारे पाणी देणे | २३०४७ | ० | ० | २३०४७ |
| ५ | पीक संरक्षण | २१५५ | ३१७० | ३१७० | ८४९५ |
| | **एकूण अनुदान** | **४५२०९** | **५१८२** | **३१७०** | **५३५६१** |
| | **देय अनुदान** | **२६७८१** | **१६०६८** | **१०७१२** | **५३५६१** |

६.२ ७/१२ वर फळबाग लागवडीची नोंद करुन घेण्याची जबाबदारी कार्यक्रमांतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याची राहील.

६.३ लाभार्थ्याने लावलेली फळझाडे पहिल्या वर्षी किमान ८० टक्के व दुसऱ्या वर्षी किमान ९० टक्के जगविणे आवश्यक राहील.

६.४ लाभार्थ्यास प्रतिवर्षी देय असलेले अनुदान त्याच्या आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग करावे.

६.५ परवाना पद्धतीने उचल केलेल्या कलमा/रोपांचे अनुदान थेट शासकीय/कृषि विद्यापीठाच्या रोपवाटीकांना देण्यात यावे.

६.६ राष्ट्रीय बागवानी मंडळ मानांकित खाजगी रोपवाटिकेवरुन उचल करण्यात आलेल्या कलमा/ रोपांचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करण्यात यावे. शासकीय अनुदानाची रक्कम व देयकाची रक्कम

यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान लाभार्थ्यास देण्यात यावे.

**(७) आर्थिक मापदंड :**

७.१ भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना राबविण्यास मान्यता देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ६ जुलै, २०१८ नुसार मंजुर झालेले फळपिकनिहाय आर्थिक मापदंड (परिशिष्ट-अ तक्ता १ ते १८) लागू राहतील.

७.२ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत निश्चित केलेल्या मजूरी दरामध्ये सुधारणा झाल्यास सदर सुधारीत दर या योजनेस लागू राहतील.

७.३ ठिबक सिंचन संचाकरीता प्रचलित केंद्र पुरस्कृत योजनेच्या मापदंडानुसार १०० टक्के अनुदानाची परिगणना करण्यात यावी.

७.४ राज्यस्तरीय समितीने निश्चित केलेले कलमा/ रोपांचे दर लागू राहतील.

**(८) लक्षांक निश्चिती :**

८.१ राज्यास प्राप्त होणाऱ्या आर्थिक लक्षांकाचे राज्यातील सर्व जिल्हयांना समन्यायी प्रमाणात वाटप करण्याच्या दृष्टिने कृषि गणना २०१०-११ नुसार जिल्हयाचे वहितीखालील क्षेत्र आणि शेतकऱ्यांची संख्या या दोन निकषांचा वापर करावा. त्याच धर्तीवर जिल्हास्तरावरुन तालुक्यांना आर्थिक लक्षांकाचे वाटप करावे.

८.२ वहितीखालील क्षेत्र आणि कृषि गणनेनुसार शेतकरी संख्या यांना ५०:५० या प्रमाणात जिल्हयांतर्गत तालुक्यांचा आर्थिक लक्षांक निश्चित करावा.

८.३ जिल्हयास प्राप्त झालेल्या एकूण आर्थिक लक्षांकापैकी कृषि गणना २०१०-११ मधील अनुसूचित जाती व जमातीच्या शेतकऱ्यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक तालुक्याचा प्रवर्गनिहाय आर्थिक लक्षांक निश्चित करावा.

८.४ सर्व प्रवर्गातील महिला शेतकऱ्यांसाठी ३० टक्के लक्षांक राखीव ठेवावा.

**(९) कलमा / रोपांचा पुरवठा :**

९.१ फळबाग लागवडीकरीता कलमे / नारळ रोपांची निवड लाभार्थ्याने स्वत: करावयाची असून त्यांनी खालीलप्रमाणे रोपवाटिकांना प्राधान्य द्यावे.

I. कृषि विभागाच्या रोपवाटिका
II. कृषि विद्यापिठांच्या रोपवाटिका
III. राष्ट्रीय बागवानी मंडळामार्फत मानांकित खाजगी रोपवाटिका

९.२ राष्ट्रीय बागवानी मंडळामार्फत मानांकित खाजगी रोपवाटिकेतून पुरवठा करण्यात येणा-या कलमे/नारळ रोपांच्या दर्जाबाबत जबाबदारी संबंधित रोपवाटिका धारकांची राहील. अशा रोपवाटिकांमधून कलमे/रोपांच्या दर्जाबाबत खातरजमा करुन लाभार्थ्याने त्याची खरेदी करावी.

**(१०) ठिबक सिंचन संच :**

१०.१ लाभार्थ्यास फळबाग लागवडीकरीता ठिबक सिंचन संच बसविणे अनिवार्य आहे.

१०.२ या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना ठिबक सिंचन संचाच्या उभारणीकरीता १०० टक्के अनुदान द्यावयाचे आहे. त्या करिता ठिबक सिंचन संच उभारणीसाठी प्रचलित असलेल्या सर्व केंद्र व राज्य योजनांच्या निधीतून अनुज्ञेय असणारे अनुदान प्रथमत: अदा करावे आणि तदनंतर आवश्यक असल्यास भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या निधीतून उर्वरीत अनुदान अदा करावे.

१०.३ फळबाग लागवडीसाठी निवड झालेल्या सर्व लाभार्थ्यांनी ठिबक सिंचन संचाकरीता प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना प्रति थेंब अधिक पिक योजने अंतर्गत पूरक अनुदान उपलब्ध करुन देण्याकरीता ई- ठिबक प्रणालीवर अर्ज भरुन द्यावेत.

१०.४ सदर यादीस प्रथम प्राधान्याने पूर्वसंमती देण्यात यावी.

१०.५ ठिबक सिंचन संच हा प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेअंतर्गत निवडलेल्या कंपन्यामार्फत व मान्य दर्जाप्रमाणे बसविणे आवश्यक आहे.

**(११) योजने अंतर्गत समाविष्ट घटकांच्या जबाबदाऱ्या :**

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेची अंमलबजावणी कृषि विभागाच्या क्षेत्रीय पातळीवरील अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत करावयाची आहे. याकरीता कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी करावयाची कामे तसेच रोपवाटीका धारक व लाभार्थी शेतक-यांच्या जबाबदा-या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

**(अ) कृषि सहाय्यक :**

११. अ-१ योजनेअंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांची क्षेत्र मर्यादा व लागवड योग्य क्षेत्राची पडताळणी करावी.

११. अ-२ लाभार्थ्यास स्वखर्चाने करावयाची कामे व ऐच्छिक स्वरुपाची कामे याबाबतची जाणीव करुन द्यावी.

११. अ-३ गावपातळीवर ग्रामसभेद्वारे प्रचार व प्रसिध्दी करावी. लाभार्थ्यांनी करावयाचा अर्जाचा नमुना गावपातळीवर उपलब्ध करुन देण्यात यावा.

११. अ-४ लाभार्थ्यांना पूर्व संमती प्रदान केल्यानंतर त्यांच्या प्रस्तावीत लागवड क्षेत्रास भेट देऊन तांत्रीक अंदाजपत्रक तयार करावे.

११. अ-५ ज्या लाभार्थीनी पूर्वसंमती नंतर ७५ दिवस सर्व बाबींसह फळबागेची लागवड केली नाही त्यांची पूर्वसंमती रद्द करण्याच्या कामी पाहणी करुन अहवाल मंडळ कृषि अधिकारी यांचेमार्फत तालूका कृषि अधिकारी यांना सादर करावा.

११. अ-६ लाभार्थ्यास ३ वर्षाच्या कालावधीत ५०:३०:२० प्रमाणे अनुदान देण्याबाबत दक्षता घ्यावी.

११. अ-७ लाभार्थी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करावयाच्या बाबींकरीता मापन पुस्तिकेत नोंदी घेण्यात याव्यात. फळपिक निहाय आर्थिक मापदंडात दर्शविल्याप्रमाणे जर प्रथम/व्दितीय वर्षाची रक्कम जास्तीची असेल तर एकुण मापदंडाच्या ५०/३० टक्केच रक्कम देय राहिल. उर्वरीत रक्कम तिसऱ्या वर्षामध्ये दयावी.

११.अ-८ प्रत्यक्ष खर्च जर मापदंडानुसार निश्चित केलेल्या खर्चापेक्षा कमी असेल तर लाभार्थ्यांना प्रत्यक्ष खर्चाएवढे अनुदान अनुज्ञेय राहील, याची काळजी घ्यावी.

११. अ-९ दरवर्षी माहे जून अखेर झाडे जिवंत असल्याबाबत तपासणी करावी व लाभार्थी अनुदानास पात्र आहे की अपात्र आहे याबाबत यादी तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावी.

११. अ-१० कलमे/रोपांची उचल शासकीय रोपवाटीका/कृषि विद्यापीठांच्या रोपवाटीकेवरुन केली असल्यास कलमां, रोपांची किंमत प्रथम वर्षातच वसुल करुन घ्यावी.

**(ब) कृषि पर्यवेक्षक :**

११. ब-१ प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पिक योजने अंतर्गत निश्चित केलेल्या कार्यप्रणालीचा अवलंब या योजनेसाठी करावा.

११. ब-२ लागवड केलेल्या क्षेत्राचे जिओ टॅगींग करावे.

**(क) मंडळ कृषि अधिकारी :**

११. क-१ प्राप्त तांत्रीक अंदाजपत्रकांची छाननी करुन ते पूर्वसंमती दिलेल्या दिनांकापासून 3 दिवसात शिफारशीसह तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे तांत्रीक व प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करावीत.

११. क-२ विहीत तपासणी मापदंडाप्रमाणे कामांची तपासणी करावी.

**(ड) तालुका कृषि अधिकारी :**

११. ड-१ लाभार्थी निवडीकरिता सोडतीचे ठिकाण, दिनांक व वेळ या बाबी उपविभागीय कृषि अधिकारी यांचे संमतीने निश्चित कराव्यात. सदर दिवशी अर्जदार उपस्थित राहील याची खातरजमा करावी.

११. ड-२ लाभार्थीची कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर २ दिवसात पूर्वसंमती प्रदान करावी व लाभार्थ्यांच्या इच्छेनुसार शासकीय/कृषि विद्यापीठाच्या रोपवाटीकांवरील कलमे/रोपे पुरवठा करण्यासाठी परवाना अदा करावा. ज्या

लाभार्थ्यांनी राष्ट्रीय बागवानी मंडळ मानांकित खाजगी रोपवाटिकेमधून कलमे / रोपे उचल करण्याची इच्छा प्रकट केली त्यांना मार्गदर्शन करावे.

११. ड-३ प्रतिक्षा यादीतील क्रमानुसार पात्र लाभार्थ्यांस पूर्वसंमती देण्यात यावी.

११. ड-४ तालुका कृषि अधिकारी यांनी योजनेचा निधी कोषागारातून आहरीत करुन संवितरीत करावा.

११. ड-५ लाभार्थी शेतकऱ्यांचे अनुदान आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करावे.

११. ड-६ लाभार्थ्याच्या १ हेक्टर क्षेत्रापर्यंत फळबाग लागवडीच्या प्रस्तावास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता प्रदान करावी. सदर मान्यता एक आठवडयाच्या आत प्रदान करावी.

११. ड-७ प्रत्येक लाभार्थ्यांच्या अंदाजपत्रकास स्वतंत्र प्रशासकिय व तांत्रीक मान्यता देण्यात यावी.

११. ड-८ लाभार्थ्याच्या १ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रावरील फळबाग लागवडीचे प्रस्ताव उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावेत.

११. ड-९ लाभार्थ्याने कलमे/ नारळ रोपे शासकिय रोपवाटिकेतून अथवा राज्यातील कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिकेतून घेतली असल्यास सदर बाबींचे अनुदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने थेट संबंधितांस अदा करावे आणि अन्य बाबींचे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करावे.

११. ड-१० लाभार्थ्यांने कलमे/नारळ रोपांची खरेदी राष्ट्रीय बागवानी मंडळामार्फत मानांकित खाजगी रोपवाटिकेतून केल्यास शासकीय अनुदानाची रक्कम व देयकाची रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान लाभार्थ्यास देण्यात यावे.

११. ड-११ सदर योजनेअंतर्गत झालेल्या कामाचे दस्तऐवज वार्षिक लेखा परिक्षणासाठी जतन करुन ठेवावेत व ते लेखा परिक्षणास उपलब्ध करावेत.

११. ड-१२ सदर योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची यादी संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावी.

११. ड-१३ लाभार्थी पात्रतेबाबत जॉब कार्ड विषयी माहिती तहसिलदार/गटविकास अधिकारी/स्थानिक प्रशासनाकडून उपलब्ध करुन घ्यावी.

११. ड-१४ विहीत तपासणी मापदंडाप्रमाणे कामांची तपासणी करावी.

**(इ) उपविभागीय कृषि अधिकारी :**

११. इ-१ लाभार्थी निवडीसाठी सोडतीचे ठिकाण, दिनांक व वेळ तसेच अर्ज स्विकृतीपासून ते सोडतीपर्यंतचे संपूर्ण नियोजन /संनियंत्रण उपविभागीय कृषि अधिकारी यांनी करावे.

११. इ-२ लाभार्थ्यांच्या १ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रावरील फळबागा लागवडीच्या प्रस्तावास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात यावी. प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत मान्यता प्रदान करावी.

११. इ-३ प्रत्येक लाभार्थीच्या अंदाजपत्रकास स्वतंत्र प्रशासकिय व तांत्रीक मान्यता देण्यात यावी.

११. इ-४ शासन राजपत्र कृषि व पदुम विभाग दिनांक १८ नोव्हेंबर, १९९८ नुसार महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधियिमम, १९६९ च्या कलम ३ अन्वये राज्यातील सर्व जिल्हयांच्या सर्व कृषि उप विभागांचे उपविभागीय कृषि अधिकारी (कृषि सेवा वर्ग-१) यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांची राहील.

११. इ-५ उपविभागीय कृषि अधिकारी यांनी शासकीय, कृषि विद्यापीठ, राष्ट्रीय बागवानी मंडळ मानांकित खाजगी रोपवाटिकांना लागवड हंगामात दोन महिन्यातून एकदा भेट देऊन कलमे / रोपांची उपलब्धता व गुणवत्तेबाबत तपासणी करुन त्याचा विहित नमुन्यातील अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत कृषि आयुक्तालयास सादर करावा.

११. इ-६ विहीत तपासणी मापदंडाप्रमाणे कामांची तपासणी करावी.

**(फ) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :**

११. फ-१ शासन निर्णयात नमूद केलेल्या निकषानुसार प्रत्येक तालुक्याकरिता आर्थिक लक्षांकाचे वाटप करण्यात यावे.

११. फ-२ तालूक्यास नेमून दिलेल्या आर्थिक लक्षांकाइतके अर्ज प्राप्त न झाल्यास त्या तालुक्यांसाठी तातडीने पुन:श्च जाहीरात द्यावी व अर्ज करण्याकरिता ८ दिवसाची मुदत द्यावी.

११. फ-३ दुसऱ्यांदा संधी देऊनही लक्षांकाएवढे अर्ज प्राप्त न झाल्यास सदर तालुक्यांच्या शिल्लक निधीचे फेरवाटप अन्य तालुक्यांच्या मागणीच्या प्रमाणात करावे. सदर कार्यवाही अर्ज सादर करावयाच्या मुदतीनंतर १५ दिवसात पूर्ण करावी.

११. फ-४ विहीत तपासणी मापदंडाप्रमाणे कामांची तपासणी करावी.

**(भ) विभागीय कृषि सहसंचालक**

११. भ-१ या योजनेचे सनियंत्रण करण्यात यावे.

११. भ-२ विभागातील कलमे / नारळ रोपांची मागणी लक्षात घेऊन आवश्यक त्या फळपिकांची कलमे / रोपांच्या उत्पादनाचे नियोजन करावे. याकरीता शासकीय व कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिकांचा आगाऊ उत्पादन आराखडा तयार करुन कृषि आयुक्तालयास सादर करावा.

११. भ-३ कृषि आयुक्तालयाने मंजूर केलेल्या कलमां/रोपांच्या उत्पादन आराखडयाची अंमलबजावणी करावी.

११. भ-४ योजनेअंतर्गत गुणवत्तापूर्ण मातृवृक्षांपासून निर्मित कलमांचा पूरवठा होण्याच्या दृष्टीने गुणनियंत्रण, रोपवाटिकांची नियमित तपासणी इत्यादी बार्बीची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी योग्यरीतीने पार पाडत आहेत याबाबत सनियंत्रण करावे.

११. भ-५ जिल्हयाचा निधी शिल्लक राहत असल्यास विभागातील अन्य जिल्हयांना शिल्लक निधीचे फेरवाटप त्यांच्या मागणीच्या प्रमाणात करावे.

११. भ-६ दरवर्षी माहे मे अखेर शासकीय, कृषि विद्यापीठांतील तसेच राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ मानांकीत खाजगी रोपवाटीकांवर उपलब्ध असलेल्या कलमां/रोपांचा अहवाल सादर करावा.

११. भ-७ विहीत तपासणी मापदंडाप्रमाणे कामांची तपासणी करावी.

**(म) कृषि आयुक्तालय :**

११. म-१ दरवर्षी एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवडयात वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन योजनाअंतर्गत इच्छुक लाभार्थ्यांकडून अर्ज मागवावेत.

११. म-२ नवीन फळपिकाचा समावेश करणेकामी शासनास प्रस्ताव सादर करणे.

११. म-३ आवश्यकतेनुसार योजनेअंतर्गत फळपीकनिहाय आर्थिक मापदंड निश्‍चित करुन शासन मान्यतेस पाठवावेत.

११. म-४ कलमे/रोपे व इतर लागवड साहित्य यांच्या नियोजनासाठी राज्यस्तरीय समितीच्या बैठकांचे आयोजन करावे.

११. म-५ कलमा / रोपांचे दर निश्‍चित करावेत.

११. म-६ विभागातील काही जिल्हयांचा निधी शिल्लक राहत असल्यास त्याचे वितरण दुसऱ्या विभागातील जिल्हयांना करण्यात यावे.

११. म-७ कृषि आयुक्तालयातील सनियंत्रण व मूल्यमापन कक्षामार्फत सदर योजनेचे मूल्यमापन करण्यात यावे व त्याचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा.

११. म-८ राज्यातील कलमे/नारळ रोपांची मागणी लक्षात घेऊन आवश्यक त्या फळपिकांच्या कलमा / रोपांच्या उत्पादनाचे नियोजन करावे. याकरीता शासकीय व कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिकांना आगाऊ उत्पादन आराखडा प्रतिवर्षी द्यावा.

११. म-९ योजनेअंतर्गत गुणवत्तापूर्ण मातृवृक्षांपासून निर्मित कलमांचा पूरवठा होण्याच्या दृष्टीने गुणनियंत्रण, रोपवाटिकांची नियमित तपासणी इत्यादी बार्बीची व्यवस्था निर्माण करणे.

११. म-१० कलमां/रोपांचे आवंटन करण्यात यावे.

**(य) रोपवाटिकाधारकांच्या जाबाबदाऱ्या :**

११. य-१ शासकीय / कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिकाधारकांनी तालुका कृषि अधिकारी यांनी अदा केलेल्या परवाना पत्रानुसार कलमा / रोपांची उपलब्धता लाभार्थ्यांना करुन देण्यात यावी.

११. य-२ प्राप्त परवाने व तालुका कृषि अधिकारी यांनी अदा केलेले परवाने यांचा ताळमेळ घेऊन देयके संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवावीत.

११. य-३ राष्ट्रीय बागवानी मंडळ मानांकित खाजगी रोपवाटिकाधारकांनी शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीप्रमाणे रोखीने कलमा / रोपांची उपलब्धता करुन द्यावी.

११. य-४ राष्ट्रीय बागवानी मंडळ मानांकित खाजगी रोपवाटिका धारकांनी या योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या कलमा / रोपांच्या दर्जाबाबत जबाबदारी घ्यावी.

११. य-५ राष्ट्रीय बागवानी मंडळ मानांकित खाजगी रोपवाटिका धारकांमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या कलमा / रोपांच्या दर्जाबाबत काही प्रश्न उद्भवल्यास महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळरोपांची विक्री (नियमन) अधिनियम १९६९ च्या कलम ६ अन्वये निश्चित केलेल्या जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास रोपवाटिकाधारक अधिनियमातील कलम ८ प्रमाणे कारवाईस पात्र राहतील.

११. य-६ राष्ट्रीय बागवानी मंडळ मानांकित खाजगी रोपवाटिका धारकांनी मानांकनाची मुदत संपण्यापूर्वीच मानांकनाकरीता प्रस्ताव सादर करुन रोपवाटिकेस मानांकनाचे वैध प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

११. य-७ शासकीय / कृषि विद्यापीठ व राष्ट्रीय बागवानी मडळ मानांकित खाजगी रोपवाटिकाधारकांनी लागवड हंगामात दरमहा झालेली विक्री व शिल्लक कलमे / रोपे या बाबतचा अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

**(र) लाभार्थ्याची जबाबदारी :**

११. र-१ भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये सहभाग घेणेकामी इच्छुक शेतकऱ्यांनी जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून किमान २१ दिवसात अर्ज सादर करावा.

११. र-२ लाभार्थी निवडीसाठी सोडतीचे ठिकाण, दिनांक व वेळेनुसार उपस्थित रहावे.

११. र-३ पूर्वसंमती नंतर ७५ दिवसात सर्व बाबींसह फळबागेची लागवड करावी.

११. र-४ तालुका कृषि अधिकारी यांचे मार्फत अदा केलेल्या परवान्यावर कलमा / रोपांची उचल केल्यानंतर लागवड करणे आवश्यक आहे अन्यथा सदर कलमा / रोपांची किंमत शासनास परत करण्याची जबाबदारी राहील. संबंधित लाभार्थ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

११. र-५ शासनाने निश्चित केलेली फळपिके, प्रजाती व लागवडीचे अंतर याचे निकष पाळणे बंधनकारक राहील आणि सदर बाबीचा भंग केल्यास संबंधित शेतकरी अनुदानास अपात्र राहील व त्यांनी परवान्यावर घेतलेल्या कलमा / रोपांची रक्कम शासनास परत करण्याची जबाबदारी राहील अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

११. र-६ ठिबक सिंचन संच ७ वर्षापर्यंत त्याच शेतात कायम ठेवणे अनिवार्य राहील.

११. र-७ कागदी लिंबू, संत्रा व मोसंबी या लिंबूवर्गीय फळपिकांच्या लागवडीकरीता माती परिक्षण अनिवार्य राहील. माती परिक्षण शेतकऱ्याने स्वखर्चाने करावे.

११. र-८ लाभार्थ्याने फळबाग लागवडीकरीता जमीन तयार करणे, माती व शेणखत / सेंद्रिय खत मिश्रणाने खड्डे भरणे, रासायनिक खत वापरुन खड्डे भरणे, आंतर मशागत करणे आणि काटेरी झाडांचे कुंपण करणे इत्यादी कामे पूर्ण करण्याची जबाबदारी राहील.

११. र-९ लाभार्थ्याने लावलेली फळझाडे पहिल्या वर्षी किमान ८० टक्के व दुसऱ्या वर्षी किमान ९० टक्के जगविणे आवश्यक राहील.

**समाविष्ट पिके :**

**या योजनेअंतर्गत बहूवार्षिक फळपिकांचा समावेश करण्यात आलेला आहे. राज्याच्या कृषि हवामान क्षेत्रास अनुकुल असणाऱ्या फळपिकांच्या कलमांची / नारळ रोपांची कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या वाणांची लागवड करण्यास मुभा राहील.**

## १. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

| अ.क्र. | फळपिक | शिफारस केलेले वाण | विभाग / जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | आंबा | केशर,**दशेहरी**, **रत्ना**, पायरी, लंगडा, **नागीन** | विदर्भातील पूर्ण जिल्हे |
| २ | काजू | वेंगूर्ला -४ | नागपूर,गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली |
| ३ | पेरू | सरदार (एल-४९), श्वेता, ललित | विदर्भातील पूर्ण जिल्हे |
| ४ | डाळींब | **भगवा**, **भगवा सुपर व** आरक्ता | वाशिम, बुलढाणा |
| ५ | संत्रा | नागपूर **संत्रा**, नागपूर सिडलेस, नागपूर संत्रा नंबर ५ | नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा |
| ६ | मोसंबी | काटोल गोल्ड, न्यूसेलर | नागपूर,वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा |
| ७ | कागदी लिंबू | पीडीकेव्ही लाईम, **पीडीकेव्ही बहार** | विदर्भातील पूर्ण जिल्हे |
| ८ | सिताफळ | बाळानगर | विदर्भातील पूर्ण जिल्हे |
| ९ | आवळा | एन-ए-७, एन-ए-१०, कांचन, कृष्णा | विदर्भातील पूर्ण जिल्हे |
| १० | चिंच | अकोला स्मृती, नंबर २६३ | विदर्भातील पूर्ण जिल्हे |
| ११ | जांभूळ | बहाडोली, स्थानिक जातीची कलमे | विदर्भातील पूर्ण जिल्हे |
| १२ | फणस | कोकण प्रॉलिफिक | विदर्भातील पूर्ण जिल्हे |
| १३ | अंजिर | पुना फिग, दिनकर | नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा |
| १४ | चिकू | कालीपत्ती, क्रिकेटबॉल | विदर्भातील पूर्ण जिल्हे |

## २. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी

| अ.क्र. | फळपिक | शिफारस केलेले वाण | विभाग / जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | आंबा | केशर, **रत्ना**, **हापूस**, **सिंधु**, पायरी, लंगडा, वनराज,तोतापूरी, साई-सुगंध, सुवर्णा , फुले अभिरुची (लोणच्याच्या कै-यांसाठी ) | पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्हे |
| २ | पेरू | सरदार | |
| ३ | डाळींब | **गणेश**, **जी-१३७**, **मृदुला**, **फुले आरक्ता**, **भगवा**, **फुले भगवा सुपर**, **फुले अनारदाना** | |
| ४ | मोसंबी | मोसंबी, फुले मोसंबी | |
| ५ | कागदी लिंबू | **फुले शरबती**, **साई शरबती** | |
| ६ | सिताफळ | **बाळानगर**, **फुले जानकी**, **फुले पुरंदर** | |
| ७ | आवळा | कांचन, कृष्णा, चकैया, निलम | |
| ८ | नारळ | बाणावली, प्रताप, टिxडी, डी x टि | |
| ९ | चिंच | प्रतिष्ठाण, अकोला स्मृती, **नंबर** २६३, अजंठा गोडचिंच | |
| १० | जांभूळ | **कोकण** बहाडोली, स्थानिक जातीची कलमे | |
| ११ | अंजिर | पुना फिग, दिनकर, फुले राजेवाडी | |
| १२ | चिकू | कालीपत्ती, क्रिकेटबॉल | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | काजू | **वेंगूर्ला** - ४, ६, ७, ८ **व** ९ | कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, अहमदनगर आणि नाशिक या जिल्हयातील पश्चिम घाटातील तालुके. |

### ३. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

| अ.क्र. | फळपिक | शिफारस केलेले वाण | विभाग / जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | आंबा | परभणी भूषण, निरंजन, **केशर, दशेहरी** | मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे |
| २ | मोसंबी | न्यूसेलर, सातगुडी | |
| ३ | कागदी लिंबू | विक्रम, प्रमालीनी, साई शरबती | |
| ४ | सिताफळ | ताड पिंपळगाव-७, धारुर-६, बाळानगर | |
| ५ | अंजिर | दिनकर, पुना फीग, बँगलोर | |
| ६ | पेरू | सरदार, **ललित** | |
| ७ | डाळींब | **गणेश, भगवा, सुपर भगवा** | |
| ८ | संत्रा | **नागपूर** संत्रा, नागपूरी सिडलेस, नागपूर संत्रा क्र. ५ | |
| ९ | चिकू | कालीपत्ती, क्रिकेट बॉल | |
| १० | आवळा | एन-ए-७, एन-ए-१०, कांचन, क्रीष्णा, कंचन, चकैय्या | |
| ११ | चिंच | नं. २६३, प्रतिष्ठान, योगेश्वरी, अजिंठा, शिवाई | |
| १२ | जांभूळ | कोकण बहाडोली | |

### ४. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

| अ.क्र. | फळपिक | शिफारस केलेले वाण | विभाग / जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | आंबा | केशर, **रत्ना, हापूस, सिंधु,कोकण राजा (सलाड) कोकण रुची (लोणचे) ऑस्टिन आणि लिली** (परदेशी ) | मुंबई व मुंबई उपनगर (शहरी भाग) वगळता इतर जिल्हे (ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग) |
| २ | काजू | वेंगूर्ला - ४, ६, ७, ८ व ९ | |
| ३ | पेरू | सरदार (एल-४९), ललित | |
| ४ | नारळ | बाणावली, प्रताप, टिXडी , ऑरेंज डॉर्फ, डी X टि | |
| ५ | कोकम | कोकण अमृता, कोकण हतिस | |
| ६ | आवळा | अम्रित, बळवंत, कांचन , कृष्णा , एन-ए-६ | |
| ७ | जांभूळ | **कोकण** बहाडोली | |
| ८ | फणस | कोकण प्रॉलिफिक | |
| ९ | चिकू | कालीपत्ती, क्रिकेटबॉल | |
| १० | लिंबू | कोकण लिंबू | |

**गुणनियंत्रण समिती :**

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत गुणवत्तापूर्ण कलमा / रोपांचा पुरवठा होण्याच्या दृष्टिने गुणनियंत्रण, रोपवाटिकांची नियमित तपासणी करणेकामी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी | अध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| २ | कृषि विद्यापीठाचे उद्यानविद्या प्रमुख / प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | कृषि विद्यापीठाचे वनस्पती विकृती / किटक शास्त्रज्ञ | सदस्य |
| ४ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक | सदस्य |
| ५ | उपविभागीय कृषि अधिकारी | सदस्य |
| ६ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील तंत्र अधिकारी | सदस्य सचिव |

सदर समिती आवश्यकतेनुसार शासकीय / कृषि विद्यापीठे / राष्ट्रीय बागवानी मंडळाच्या मानांकित खाजगी रोपवाटिकांना भेट देऊन गुणनियंत्रणाबाबत तपासणी करेल आणि गुणवत्ता नियंत्रणाबाबत उपाययोजना सुचवेल. तसेच गुणनियंत्रणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेईल. उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आलेल्या गुणनियंत्रणाच्या जबाबदारीबाबत वेळोवेळी आढावा घेईल. गुणनियंत्रण समीतीने सुचविलेल्या उपाययोजनेची अंमलबजावणी उपविभागीय कृषि अधिकारी करतील.

**तपासणी बाबत कार्यपद्धती :**

योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने लाभार्थ्याने केलेल्या कामाची पुढीलप्रमाणे तपासणी करण्यात यावी.

| अ.क्र. | पदनाम | तपासणीचे मापदंड |
|---|---|---|
| १. | विभागीय कृषि सह संचालक | १ काम प्रति माह |
| २. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ काम प्रति माह |
| ३. | उपविभागीय कृषि अधिकारी | ३ काम प्रति माह |
| ४. | तालुका कृषि अधिकारी | ५ काम प्रति माह |
| ५. | मंडल कृषि अधिकारी | १० टक्के |

तपासणीचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत विभागीय कृषि सहसंचालक यांना दर महिन्याला सादर करावा. विभागीय कृषि सहसंचालक यांनी तपासणी मापदंडाप्रमाणे लागवडीची तपासणी होत असल्याचे प्रमाणपत्र कृषि आयुक्तालयास सादर करावे.

**प्रशासकिय खर्च -**

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या एकूण निधीच्या २ टक्के निधी प्रशासकीय बाबींवरील खर्चास मान्यता राहील. यामध्ये अत्यावश्यक हँडबिल/फॉर्म, मापन पुस्तिका इत्यादी छपाई, फळझाड लागवडी विषयी प्रसिद्धी पुस्तके, स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी, प्रचार व प्रसिध्दी, मूल्यमापन, स्टेशनरी इत्यादीसाठी खर्च करता येईल. प्रशासकिय बाबींवर करण्यात येणारा खर्च हा संबंधित अधिकाऱ्यांना असणाऱ्या वित्तीय अधिकारानुसार करावा.

**मासिक प्रगती अहवाल -**

सदरचा कार्यक्रम मंजुर केलेल्या उद्दीष्टांनुसारच राबविण्यात यावा. योजनेअंतर्गत केलेल्या कामाचा प्रगती अहवाल विभागीय कृषि सह संचालक यांनी दर महिन्याच्या १० तारखेपर्यत कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**मार्गदर्शक सूचना व शासन निर्णय यामध्ये काही विसंगती आढळल्यास शासन निर्णय अंतिम राहिल.**

**संचालक फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे - ४११ ००५.**

**अर्ज**

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी,**
**तालुका ............. जिल्हा .....................**

**विषय : भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचा लाभ मिळणे बाबत...**

मी / आम्ही, माझ्या / आमच्या स्व:मालकीच्या जमीनीवर भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत फळबाग लागवड करु इच्छित आहे / आहोत. माझी / आमची वैयक्तिक माहिती आणि धारण केलेल्या जमिनीसंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

**वैयक्तिक माहिती :**

१. शेतकऱ्याचे नाव :- ..........................................................................................

२. गाव .......... तालुका .............. जिल्हा ...........................

३. लाभार्थ्यांचा प्रवर्ग - सर्वसाधारण / अनु.जाती/अनु.जमाती/ महिला/दिव्यांग- ................

४. मी / आमची उपजिवीका पुर्णपणे शेतीवर अवलंबून आहे / नाही - ....................

५. आधार संलग्न बँक खाते तपशिल - बँकेचे नाव : ................................ शाखा : .............................
खाते क्रमांक : ................................ आयएफएस कोड : ............................

६. आधार कार्ड क्र. :

७. ८-अ प्रमाणे एकूण जमीन धारणा क्षेत्र ....... हे....... आर; भूमापन क्रमांक (गट नं. / सर्व्हे नं.)...........

८. संयुक्त खातेदार असल्यास अर्जदाराच्या हिश्याचे प्रमाणानुसार
क्षेत्र ..........हेक्टर ........ आर; भूमापन क्रमांक(गट नं. / सर्व्हे नं.).............

९. शासकीय याजनेतंर्गत पूर्वी फळबाग लागवड केली असल्यांस तपशील -
लागवड वर्ष...........; क्षेत्र ..............हेक्टर; भूमापन क्रमांक (गट नं. / सर्व्हे नं.).............

१०. **लागवड करावयाच्या फळपिकांचा सविस्तर तपशील :**

| अ.क्र. | फळपिकाचे नाव | झाडातील अंतर (मी.) | भूमापन क्र. (गट नं./सर्व्हे नं.) | लागवडीचे क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| एकूण लागवडीचे क्षेत्र | | | | |

**(टीप : पिकांच्या संख्येनुसार तक्त्यातील ओळींची संख्या ठेवावी)**

११. मला / आम्हाला शासकीय अथवा कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिकेतून कलमे / नारळ रोपे उचल करण्याची इच्छा आहे / नाही - ....................

१२. सोडती नंतर २ दिवसात सादर करावयाची कागदपत्रे :

| अ.क्र. | **कागदपत्रे** |
|---|---|
| १ | ७/१२ व ८-अ उतारा |
| २ | हमीपत्र |
| ३ | संयुक्त खातेदार असल्यास सर्व खातेदारांचे संमतीपत्र |
| ४ | आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत (फोटोसहीत) |
| ५ | आधार कार्ड छायांकित प्रत |
| ६ | जातीचे प्रमाणपत्र (अनु.जाती/अनु.जमातीशेतकऱ्यांसाठी) |

शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या नियम व अटी मला/ आम्हाला मान्य आहेत. योजनेंतर्गत माझ्या भागाकरिता कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या फळपिकांच्या वाणांची शिफारस केलेल्या अंतरावर लागवड करेनव फळबागेची सुयोग्य जोपासना करण्याची मी हमी देतो.

मला सदर योजनेत सहभागी करुन घ्यावे, ही विनंती.

**आपला / आपली विश्वासू,**

**स्थळ-** ……………………….

**दिनांक** - ………………….

…………………………………………………..

**(शेतकऱ्याचे नाव व स्वाक्षरी)**

**हमीपत्र**
**(साध्या कोऱ्या कागदावर)**

महाराष्ट्र शासनाने भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना मंजूर केली असून त्याकरीता माझ्या / आमच्या मालकीच्या जमीनीवर ही योजना राबविण्यास इच्छुक आहे, करीता हे हमीपत्र लिहून देत आहे / आहोत.

१. या योजनेचे नियम व अटी मला / आम्हाला बंधनकारक आहेत व त्यानुसार मी फळबागेची लागवड करेन. तसेच, शासनाने वेळोवेळी केलेल्या नियम व अटींमधील बदल मला / आम्हाला मान्य राहतील.

२. या योजनेत भाग घेण्यापूर्वी मी / आम्ही शासनाच्या फळबाग लागवड योजनेखाली ........... क्षेत्रावर फळबाग लागवडीचा लाभ घेतलेला आहे.

३. सदर योजनेतंर्गत एकूण क्षेत्राप्रमाणे व फळपिकाप्रमाणे शासनाने प्रतिवर्षी मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च मी / आम्ही स्वत:. करण्यास तयार आहे.

४. योजनेअंतर्गत फळबाग लागवड झाल्यानंतर त्याची नोंद ७/१२ वर घेण्याची जबाबदारी माझी / आमची राहील.

५. फळबाग लागवडीनंतर दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी फळझाडांच्या किमान ८० टक्के व ९० टक्के झाडे जिवंत ठेवण्याची जबाबदारी माझी / आमची राहील. फळझाडे वरीलप्रमाणे जिवंत राहिली नाही तर त्याची संपूर्ण जबाबदारी माझी / आमची राहिल व यावर झालेला सर्व खर्च व्याजासह मी/आम्ही शासनास परत करण्यास बांधील राहू / राहील. तसेच उर्वरीत अनुदान घेण्यास मी/आम्ही पात्र राहणार नाही याची मला/आम्हाला जाणीव आहे.

६. गाव - .................. ता. ................जि. .............. येथील भूमापन क्र. ......... हे माझ्या / आमच्या मालकीचे ......... हे. क्षेत्रावर फळबाग लागवड करेल आणि त्याऐवजी अन्य क्षेत्रावर लागवड केल्यास योजनेअंतर्गत अनुदानास मी अपात्र राहील.

७. या योजनेच्या अटी व शर्तीनुसार फळबागेची लागवड करण्यास मी बांधील असून त्यात कोणतीही कसुर झाल्यास योजनेअंतर्गत अनुदानास मी अपात्र राहील याची मला जाणीव आहे.

८. या योजनेअंतर्गत मला/आम्हाला कृषि विद्यापीठांनी कृषि हवामान क्षेत्राकरीता शिफारस केलेली फळपिके, वाण / प्रजाती व पिकांतील अंतर बंधनकारक राहतील. योजेनअंतर्गत पिकांमधील अंतराच्या अटींचे उल्लंघन केल्यास मी / आम्ही अनुदानास अपात्र राहील / राहू याची मला जाणीव आहे.

९. या योजनेंतर्गत माझ्याकडून कोणत्याही शासकीय यंत्रणेची फसवणूक झाल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील हे मला ज्ञात आहे.

१०. माझा शेतीशिवाय कोणताही व्यापार, व्यवसाय वा नौकरी नसून माझी व माझ्या कुटुंबाची उपजिविका केवळ शेतीवर अवलंबून आहे / नाही.

११. शासकीय/कृषि विद्यापीठाच्या रोपवाटीकेवरुन उचल केलेल्या कलमां/रोपांची लागवड मी/आम्ही करु. लागवड न केल्यास कलमा/रोपांचे पैसे परत करण्यास मी/आम्ही बांधील राहू.

**ठिकाण : ..............................**

**दिनांक : .............................**

**(अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी)**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**जाहीरात**

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना : सन २०१८-१९

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-१९ मध्ये राज्यात राबविण्यात येत असुन त्यामध्ये खालील नमुद फळबागांच्या लागवडीसाठी शासकीय अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | फळपिक | अंतर (मी) | हेक्टरी झाडे संख्या | प्रति हेक्टरी कमाल अनुदान मर्यादा (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | आंबा कलमे | १० x १० | १०० | ५३५६१ |
| २ | आंबा कलमे (सघन लागवड) | ५ x ५ | ४०० | १०१९७२ |
| ३ | काजू कलमे | ७ x ७ | २०० | ५५५७८ |
| ४ | पेरू कलमे (सघन लागवड) | ३ x २ | १६६६ | २०२०९० |
| ५ | पेरू कलमे | ६ x ६ | २७७ | ६२२५३ |
| ६ | डाळींब कलमे | ४.५ x ३ | ७४० | १०९४८७ |
| ७ | संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू कलमे | ६ x ६ | २७७ | ६२५७८ |
| ८ | संत्रा कलमे (इंडो-इस्त्राईल तंत्रज्ञान) | ६ x ३ | ५५५ | ९९७१६ |
| ९ | नारळ रोपे बाणावली | ८ x ८ | १५० | ५९६२२ |
| १० | नारळ रोपे टी/ डी | ८ x ८ | १५० | ६५०२२ |
| ११ | सिताफळ कलमे | ५ x ५ | ४०० | ७२५३१ |
| १२ | आवळा कलमे | ७ x ७ | २०० | ४९७३५ |
| १३ | चिंच कलमे | १० x १० | १०० | ४७३२१ |
| १४ | जांभूळ कलमे | १० x १० | १०० | ४७३२१ |
| १५ | कोकम कलमे | ७ x ७ | २०० | ४७२६० |
| १६ | फणस कलमे | १० x १० | १०० | ४३५९६ |
| १७ | अंजिर कलमे | ४.५ x ३ | ७४० | ९७४०६ |
| १८ | चिकू कलमे | १० x १० | १०० | ५२०६१ |

**योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील —**

१. सर्व प्रवर्गाअंतर्गत ज्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाची उपजिवीका केवळ शेतीवर अवलंबून आहे त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल व त्यानंतर अन्य शेतकऱ्यांचा विचार करण्यात येईल. (कुटुंबाची व्याख्या - पती, पत्नी व अज्ञान मुले)

२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी याजनेमध्ये पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांना या (MREGS) योजनेचा प्रथम फायदा घेतल्यानंतरच उर्वरीत क्षेत्रासाठी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमूधन लाभ घेता येईल.

३. प्रत्येक तालुक्यास प्राप्त होणाऱ्या आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत योजनेच्या निकषानुसार पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

४. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना कृषि विद्यापीठांनी कृषि हवामान क्षेत्राकरीता शिफारस केलेल्या फळपिकांच्या वाणांची व उपरोक्त तक्त्यात नमूद फळपिकांच्या अंतराच्या शिफारशीनुसार फळबागेची लागवड करणे बंधनकारक राहील.

५. योजनेअंतर्गत केवळ कलमांच्या लागवडीला (नारळ वगळता) अनुदान देय राहील.

६. फळ पिकांची कलमे / रोपे प्राधान्याने शासकीय, कृषि विद्यापीठ, राष्ट्रीय संशोधन संस्था व राष्ट्रीय बागवानी मंडळ मानांकित रोपवाटिकेतूनच घेणे बंधनकारक राहील.

७. लाभार्थ्यांना शासकीय वा कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिकेतील उपलब्ध कलमे / रोपे उधारीवर देण्यात येतील. त्याकरीता लाभार्थ्यास परवाना देण्यात येईल व कलमे / रोपांचे अनुदान थेट संबंधित संस्थेस अदा करण्यात येईल.

८. राष्ट्रीय बागवानी मंडळ मानांकित रोपवाटिकेतील कलमे / रोपांच्या गुणवत्तेची जबाबदारी संबंधित रोपवाटिका धारकांची राहील. सदर रोपवाटिकेतून लाभार्थ्यांनी स्वत:च्या जबाबदारीवर कलमे / रोपे खरेदी करावीत तथापी, कलमे / रोपांचे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करण्यात येईल.

९. योजनेअंतर्गत फळबागेकरिता ठिबक सिंचन बंधनकारक राहील.

१०. फळबाग लागवडीच्या अनुदानाची रक्कम पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी अनुक्रमे ५०, ३० व २० टक्के प्रमाणे लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात अदा करण्यात येईल.

११. उपरोक्त फळपिकांच्या बागांची लागवड करण्याकरीता शेतकऱ्यांनी जाहीरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून २१ दिवसाच्या आत विहित नमुन्यातील अर्ज संबंधित तालुका कृषि अधिकाऱ्यांकडे सादर करावेत.

१२. योजनेअंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांनी सोडतीनंतर दोन दिवसात **'७/१२ व ८-अ उतारा, संयुक्त खातेदार असल्यास सर्व खातेदारांचे संमती पत्र, हमीपत्र, आधारकार्ड प्रत, जातीचे प्रमाणपत्र (अनु.जाती/अनु.जमाती), आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक पासबुकच्या प्रथम पानाची प्रत (फोटोसहीत),'** ही कागदपत्रे तालुका कृषि अधिकारी कार्यालयात सादर करावीत.

१३. तालुक्याच्या आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत शेतकऱ्यांची सोडतीद्वारे योजनेंतर्गत लाभार्थी म्हणून निवड करण्यात येईल व उर्वरित शेतकऱ्यांसाठी प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल, सदर प्रतिक्षा यादी चालू लागवड हंगामासाठी असेल.

१४. योजनेसाठी अर्जाचा विहीत नमुना WWW.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावा अथवा कृषि विभागाच्या मंडळ / तालुका / उपविभाग / जिल्हा कार्यालयाशी संपर्क करावा.

१५. योजनेच्या अटी व शर्तीचा भंग झाल्यास लाभार्थी वसूलीस व दंडात्मक कारवाईस पात्र राहील.

**आयुक्त (कृषि)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**नमुना अंदाजपत्रक**

**भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना : सन २०१८-१९**

**शेतकऱ्याचे नाव** - .............................................. **गाव** - .................. **ता.** .................... **जि.** ......................

**संवर्ग** - ...................... **फळपिकाचे नाव** - ............................... **भूमापन क्र.** - .......... **क्षेत्र** - ............ **हे.**

**कलमे / रोपे संख्या प्रती हेक्टरी** ...................... (**अंतर** ----- x ----- **मीटर**)

| **अ.क्र.** | **बाब** | **पहिले वर्ष** ---------- | **दुसरे वर्ष** ---------- | **तिसरे वर्ष** ------------ | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १ | खड्डे खोदणे | | | | |
| २ | कलमे लागवड करणे (नारळाच्या बाबतीत रोपे) | | | | |
| ३ | **पीक** संरक्षण | | | | |
| ४ | नांग्या भरणे | | | | |
| ५ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | | | | |
| | **एकुण** | | | | |

**कृषि सहाय्यक** **कृषि पर्यवेक्षक**

**शिफारस प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री. / सौ. .............................................................. भूमापन क्र. ............ यांचे ................फळपिकाचे लागवडीचे अंदाजपत्रक तांत्रीकदृष्टया योग्य असून आर्थिक मापदंडानुसार असल्याचे खात्री करण्यात आली आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**मंडळ कृषि अधिकारी**

**तांत्रिक व प्रशासकिय मंजूरीचे आदेश**

जा. क्र. ................................

**उपविभागीय / तालुका** कृषि अधिकारी कार्यालय

श्री. / सौ. ............................................................... भूमापन क्र. ......... भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या शासन निर्णयातील नियम व अटींच्या अधीन राहून रक्कम रु. ............... (अक्षरी ...........................................) तांत्रिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**उपविभागीय / तालुका कृषि अधिकारी**

**नमुना अंदाजपत्रक**

**भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना : सन २०१८-१९**

**शेतकऱ्याचे नाव - किसन राघू पाटील गाव - पिसर्वे. ता. ...भोर....... जि. पुणे....**
**संवर्ग - सर्वसाधारण फळपिकाचे नाव - आंबा भूमापन क्र.** - १०२ **क्षेत्र** - १ **हे.**
**कलमे / रोपे संख्या प्रती हेक्टरी** १०० (**अंतर** १० x १० **मीटर**)

| **अ.क्र.** | **बाब** | **पहिले वर्ष** २०१८-१९ | **दुसरे वर्ष** २०१९-२० | **तिसरे वर्ष** २०२०-२१ | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १ | खड्डे खोदणे | ९९४७ | ० | ० | ९९४७ |
| २ | कलमे लागवड करणे (नारळाच्या बाबतीत रोपे) | १००६० | ० | ० | १००६० |
| ३ | नांग्या भरणे | ० | २०१२ | ० | २०१२ |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | २३०४७ | ० | ० | २३०४७ |
| ५ | **पिक संरक्षण** | २१५५ | ३१७० | ३१७० | ८४९५ |
| | **एकुण** | **४५२०९** | **५१८२** | **३१७०** | **५३५६१** |

**कृषि सहाय्यक** **कृषि पर्यवेक्षक**

**शिफारस प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री. **किसन राघू पाटील** भूमापन क्र. **१०२** यांचे **आंबा** (१० x १०**मी.**) फळपिकाचे लागवडीचे अंदाजपत्रक तांत्रीकदृष्टया योग्य असून आर्थिक मापदंडानुसार असल्याचे खात्री करण्यात आली आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**मंडळ कृषि अधिकारी**

**तांत्रिक व प्रशासकिय मंजूरीचे आदेश**

जा. क्र. ..................................
**उपविभागीय / तालुका** कृषि अधिकारी कार्यालय, भोर

**दिनांक** / /२०१

श्री. किसन **राघू पाटील** भूमापन क्र. १०२ भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या शासन निर्णयातील नियम व अटींच्या अधीन राहून रक्कम रु. ५३५६१/- (अक्षरी रक्कम रुपये त्रेपन्न हजार पाचशे एकसष्ट फक्त) तांत्रिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

उपविभागीय / तालुका कृषि अधिकारी, भोर

## पूर्व संमति पत्र

जा. क्र. -------------------
तालुका कृषि अधिकारी,--------
दिनांक / /२०१

प्रति,

श्री. ----------------------
रा. -----------------------
ता.---------- जि. ---------

महोदय,

आपल्या दिनांक …………….. चे अर्जाचा विचार होऊन आपली निवड भाऊसाहेब फुंकर फळबाग लागवड योजना सन २०१ -१ मध्ये करण्यात आली आहे. आपल्या अर्जाप्रमाणे सर्व्हे नं. ………………. मधील ………. हेक्टर वर …………. या फळपिकांचे …………………. मी. अंतरावर लागवडीसाठी मान्यता देण्यात येत आहे.

२. या लागवडीसाठी प्रति हेक्टरी देय ठरणाऱ्या खर्च प्रमाणकाची प्रत आपल्या माहितीसाठी या सोबत जोडण्यात

येत आहे.

३. व्दितीय व तृतीय वर्षात जिवंत झाडांची टक्केवारी विहित प्रमाणात असल्यासच आपणास अनुदान देय राहिल.

४. हे पत्राच्या दिनांकापासून ७५ दिवसाच्या मुदतीत सर्व बाबींसह लागवडीची कामे पूर्ण करावीत.

५. जरी आपण एखाद्या बाबींवर प्रमाणकापेक्षा जास्त खर्च केला तरी खर्च प्रमाणकाप्रमाणेच आपणांस रक्कम

अदा केली जाईल.

आपला विश्वासू,

तालुका कृषि अधिकारी,………….

# <u>रोपवाटिका तपासणी प्रपत्र</u>

**तालुका:-** **जिल्हा:-** **तपासणी दिनांक :-**

| **अ.क्र** | **बाब** | **तपासणीचा तपशील** |
|---|---|---|
| १) | फळपिकाचे नाव- | |
| २) | रोपवाटिकेचे नाव व ठिकाण- | |
| ३) | रोपवाटिका धारकाचे नाव- | |
| | पत्ता- | |
| ४) | रोपवाटिका परवाना क्रमांक : | |
| | मुदत कालावधी : | ते |
| ५) | फळपिक वाण- | |
| ६) | मातृवृक्षांची माहिती- | ६.१ लागवड वर्ष: वय वर्षे: |
| | | ६.२ संख्या: |
| | | ६.३ उगमस्थान: |
| | | ६.४ सद्यस्थीती तपशील |
| ७) | उत्पादित केलेली कलमे रोपे | ७.१ मागील वर्षाचे उत्पादन: |
| | | ७.२ चालू वर्षाचे उत्पादन: |
| | | एकूण: |
| ८) | कलमारोपावरील कीड-रोग प्रादुर्भाव | होय / नाही |
| ९) | प्रादुर्भाव असल्यास प्रादुर्भावाचे प्रमाण | |
| | ९.१) कीड/रोगग्रस्त कलमे-रोपे संख्या | |
| | ९.२) कीड/रोगमुक्त कलमे-रोपे संख्या | |
| १०) | कलमे असल्यास कलमांचे जोडाची जमीनीपासून उंची ( से. मी.) | |
| ११) | कलमांची उंची (सेमी) | |
| १२) | कलमाचे तपासणी दिनांकास वय (महीने) | |
| १३) | कलमांना दिलेला विश्रांती कालावधी(महीने) | |
| १४) | **लागवडीस पात्र कलमे संख्या:** | |
| | लागवडीस अपात्र कलमे संख्या: | |
| १५) | तपासणीचे अभिप्राय | |

**<u>नाव</u>** **<u>स्वाक्षरी</u>**

तपासणी प्रमुख :-

समीती सदस्य १.

२.

३.

सदस्य सचिव :-

रोपवाटिका धारकाची स्वाक्षरी:-

इतर उपस्थित अधिकारी :- १.

२.